मार्केटिंगसाठी डिजिटल उपाय

Venkat Maroju

हरीयाणा फलोप्तादन विभाग आणि सोर्सट्रेस डिजिटल प्लॅटफॉर्मने उत्पादक आणि खरेदीदारांना एका प्लॅटफॉर्मवर आणण्यासाठी सहयोगाने प्रयत्न केले. डिजिटल उपक्रम शेतकरी उत्पादक कंपन्यांना (FPOs) बाजारातून जास्त किमती मिळवण्यास बळ प्रदान करतो, ज्यायोगे उत्पादकांना आर्थिक परतावा मिळतो.

फलोत्पादनाने केवळ शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली नाही तर महिलांचा दर्जा वाढवण्यात ही महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे, मशरूम लागवड, स्ट्रॉबेरी पिकिंग, फुलांचे उत्पादन आणि भाजीपाला बियाणे उत्पादन उद्योग यासारख्या क्षेत्रात रोजगारक्षमता वाढवली आहे. या क्षेत्राचा भारतातील कृषी जीडीपीमध्ये केवळ ८.५ जिराईन जमिनीपासून २४.४ टक्क्यांहून अधिक वाटा आहे. फळे आणि भाजीपाला या दोन्ही पिकांचे उत्पादनामुळे भारताला ताजी समशीतोष्ण फळे आणि भाज्यांचा मोठा निर्यातदार म्हणून गणले जाते.

तथापी, शेती व्यवसायातील लहान शेतकऱ्यांपुढील आव्हाणे चिंतेचे कारण बनली आहेत. कारण फळबाग हे सर्व ताज्या उत्पादनांचे नाजूक संतूलन, गोदामांमध्ये वाहतूक किंवा सर्वात वाजवी आणि सध्याच्या बाजार दराने खरेदीदारांना थेट विक्री करण्याबद्यल आहे.

पीक फेर बदल

महामारीमुळे भाजीपाला आणि फळ शेती उद्योग विस्कळीत झाला आहे. पार खंडीत झालेल्या वाहतूक व्यवस्थेमुळे कुजलेला शेतमाल, भाजीपाला, फळे तसेच त्यांची नासाडी याच संदर्भातील बातम्या येत आहेत. भाजीपाला बियाणे विक्रीत २० ते ३० टक्के घट झाल्याचा दावा उद्योग सुत्रांनी केला आहे. वाहतूक, भाजीपाला, मार्केटींग, साधनांचा अभाव, पीक काढण्यासाठी मजुरांची तीव्र टंचाई अशा समस्या उत्पादकांना भेडसावत असताना, अनेकजण धान्य लागवडीकडे वळत आहेत.

मध्य प्रदेश, उत्तरप्रदेश आणि बिहार यासारख्या राज्यांनी भाज्याऐवजी मका लागवडीकडे वाटचाल केली, अशी माहिती नॅशनल सीड असोसीएशन ऑफ इंडीया (एनएसएआय) ने दिली. तसेच भेंडी, भोपळा आणि लौकीसह टोमॅटोच्या लागवडीला मोठा फटका बसू शकतो, असेही एनएसआयने नमूद केले. संपूर्ण भारतामध्ये फुलकोबीच्या (गोबी) लागवडीत मोठ्या प्रमाणात घट झाल्याची अटकळ होती. याउलट, मध्य प्रदेशात कांद्यांच्या बियाण्यांनी चांगली कामगिरी केली आणि त्यामुळे कांद्याचे चांगले पीक अपेक्षित आहे.

व्हेजिटेबल ग्रोअर्स असोसिएशन ऑफ इंडिया (व्हीजीएआय) च्या मते, लॉकडॉउन दरम्यान बागायतदारांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. एपीएमसी (कृषी उत्पन्न बाजार समिती) बंद झाल्यामुळे हे बागायतदार भाजीपाला आणि फळांची शेती करू इच्छित नाहित. त्यापैकी एक मोठा वर्ग उसाच्या शेतीकडेही वळला आहे.

लॉकडॉउन दरम्यान, महाराष्ट्रातील काही टक्के लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांनी हाउसिंग सोसायटी आणि हाउसिंग कॉम्प्लेक्सशी (गृहसंकूल) जोडलेल्या शेतकरी गटांशी हातमिळवणी केली, जणेकरून या सोसायट्यांच्या दारात ताज्या भाज्या आणि फळे विकता येतील. साहजिकच या उपक्रमामुळे नफा थेट शेतकऱ्यांनी मिळवला आणि ग्राहकांना चांगला शेतमाल भाजीपाला मिळाला. अर्थात हे प्रयोग शहराच्या सीमेजवळ असलेल्या गावांपुरतेच मर्यादित होते.

फळे आणि भाजीपाला उद्योगात विद्यमान कृषी तंत्रज्ञान

जेव्हा फलोत्पादनामध्ये तंत्रज्ञानाचा वापर केला जातो तेव्हा डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर प्रामुख्याने तीन प्रकारे केला जातो; शेतकऱ्यांना उत्पादन, कीड/कीटक नियंत्रण, सूची व्यवस्थापन आणि ट्रॅकिंगपासून त्यांच्या संपूर्ण परिचालनाचे (ऑपरेशन्स)अवलोकन या गोष्टी शेतांच्या डिजिटायझेशनमुळे साध्य होतात. दुसरे म्हणजे, हवामान स्मार्ट प्रिसिजन फार्मिंग, माती, पर्यावरण आणि पिकाच्या विविध मापदंडांची (पॅरामीटर्सची) नोंद करण्यासाठी सेंन्सिंग तंत्रज्ञानाचा वापर करून डेटा आधारीत निर्णय घेण्यासह उत्पादकांना मदत करते. तिसरे, कृषी बाजाराचे ठिकाण प्रामुख्याने किंमतीविषयक सूचना (प्राईस अलर्ट), कृषीविषयक बातम्या, शक्य असेल तेथे स्थानिक भाषांमध्ये सरकारी मंडीच्या किमती, शेतकऱ्यांना विक्रेत्यांशी जोडणे आणि चर्चेद्वारे किंमत ठरविणे सुलभ करते. याचा परिणाम प्रामुख्याने खर्चात (पाणी, उर्जा, खते, आणि किटकनाशके) बचत होते, उत्पादनाचे नुकसान टळते (नियंत्रित योग्य हवामान, कापणीच्या वेळा) आणि प्रक्रिया स्वयंचलित करून नियमित फील्ड कार्ये अनूकूल करतात. याव्यतिरिक्त, इष्टतम उत्पादनापर्यंत पोहोचण्यासाठी कोणतेही पूर्व समायोजन करण्यासाठी पिकांवर रिअल टाईम अलर्ट देखील एक जमेची बाजू आहे.

शेतकऱ्यांना डिजिटल स्वरूपात संघटित करणे

स्मॉल फार्मर्स ॲग्री बिझनेस कन्सोर्टियम (एसएफएसीएच) आणि हरयाणा फलोत्पादन विभागाने, फलोत्पादन शेतकऱ्यांना बळ देण्यासाठी सोर्सट्रेस द्वारे डिजिटल उपाययोजना (सोल्यूशन) उपलब्ध केल्या आहेत. हरयाना फलोत्पादन विभाग शेतकरी आणि शेती आधारीत समुदायांच्या कल्याणासाठी एक प्रतिसादात्मक आणि कार्यात्मक यंत्रणा उपलब्ध करून देण्यासाठी वचनबद्ध आहे. या संस्थांनी राज्यातील शेतकऱ्यांची सर्वांगीन प्रगतीसाठी आणि एफपीओच्या व्यवस्थापनासाठी वाढत्या माहिती तंत्रज्ञानाचा (आयटी) वापर करण्याची गरज ओळखली आहे. या प्रकल्पामध्ये सुमारे

डिजिटल प्लॉटफॉर्ममुळे दलालांची हकालपट्टी झालीच पण त्या बरोबरच उत्पादनाला चांगला भाव मिळू लागला.

१००,००० शेतकरी प्रोफाईल तयार करणे आणि त्यांच्या शेतांचे डिजिटलायझेशन करणे याचा समावेश आहे.

''कृषी क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करून शेतकरी समुदायांना बळकट करणे हा आमचा दृष्टीकोन आहे. ज्यामध्ये प्रत्येक शेतकरी आणि एफपीओचे सदस्य फलोत्पादन सेवेत जलद आणि सुलभ प्रवेशासाठी सोर्सट्रेस सारख्या सर्वसमावेश प्लॅटफॉर्मचे फायदे मिळवू शकतील, आणि राज्यातील शेतकऱ्याचे जीवनमान अधिक चांगले होईल, अशी आमची संकल्पना आहे.'' असे एसएफएसीएच चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अर्जुन सिंह यांनी सांगीतले.

शेतकऱ्यांना बहुआयामी प्रोत्साहन

कापणीचा लाभ घेण्यासाठी, हरयाणा फलोत्पादन विभाग आणि सोर्सट्रेस डिजिटल प्लॅटफॉर्मने बाजार जोडणीसाठी (लिंकेज) सहकार्य केले. उत्पादक आणि खरेदीदारांना एक समान मंचावर आणले, जेणेकरून खरेदीदार थेट एफपीओ आणि शेतकऱ्यांकडून ताजे उत्पादन खरेदी करू शकतील. संभाव्य खरेदीदारांना (निर्यातदार, बाजार खरेदीदार,स्थानिक कीरकोळ विक्रेते) पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी विभागातर्फे प्रोत्साहन दिले जाते. नंतर जिल्हा, पीक, विविधता, श्रेणी (ग्रेड) आणि एफपीओ सारख्या फील्टरचा वापर करून उत्पादनाचे निरीक्षण केले जाते. उत्पादकांचे डिजिटायझेशन प्रोफाईल एफपीओ मधील व्यक्तीच्या संपर्क विवरणासह, वास्तविक वेळेत उत्पादनाची उपलब्ध मात्रा प्रदर्शित करण्यास सक्षम करते, त्यामुळे करार बंद करण्यासाठी खरेदी प्रक्रिया सुटसुटीत केली जाते.

सर्वप्रथम, कीड आणि पीक रोगांचे व्यवस्थापन करण्यासाठी शेतकऱ्यांना मोबाईल ऍप्लिकेशनद्वारे वेळेवर आणि नियमित सल्ला देण्यात येत आहेत, पीक आधारीत सल्ल्याच्या माध्यमातून कृषी उत्पादकांना तज्ज्ञांशी जोडण्यात येते. त्यांच्या मोबाईल सेवांचा वापर सूलभ आणि सुनिश्चित करण्यासाठी, वापरकर्ता इंटरफेस लवचिकता, स्थानिक भाषा आणि तज्ज्ञांपर्यत त्वरीत पोहचण्याची गरज लक्षात घेवून हे ॲप डिझाईन केले आहे.

हे अप्लिकेशन (ॲप) गुगल प्ले स्टोअर वरून सहज डाउनलोड केले जाते आणि सोप्या नोंदणी प्रक्रीयेमुळे शेतकऱ्याला किड आणि रोगांचा तपशील कळण्यास मदत होते. भारतीय कृषी संशोधन परीषदेच्या (आयसीएआर) सहकार्याने आणि मान्यतेने, प्रणालीमधील (सिस्टिम) प्रमुख किटक आणि रोगांची प्रीलीडेड छायाचित्रे वापरून हे सहज शक्य झाले आहे. वापरकर्ता अर्थात युजर शेतातील कीटक/रोग याची सहजतेने जुळवणी करू शकतो. तसेच पुर्वी केलेल्या शिफारसी उपलब्ध आहेत. मात्र नसल्यास, उत्पादक प्रभावीत रोपाच्या चित्रावर क्लिक करू शकतो आणि टिप्पण्यांसह अपलोड करू शकतो. हि माहीती कृषी विभागातील तज्ज्ञ किंवा शास्त्रज्ञांना दिली जाते. हे तज्ज्ञ संबंधित शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे योग्य तो सल्ला देतात.



डिजिटल सक्षम शेतकरी

दुसरे म्हणजे, हे डिजिटल प्लॅटफॉर्म हरयाणा राज्यातील शेतकऱ्यांना एफपीओ आणि त्यांच्या संबंधित क्लस्टर्सशी (४५६ क्लस्टर्स सहभागी आहेत.) जोडते. या डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे क्लस्टर्स/ एफपीओ/ शेतकऱ्यांचा विभागावर आढावा घेण्यात येतो./ विवारणामध्ये पीक, उत्पादन इनपुट ॲप्लिकेशन आणि वैध योजनांवरील रिअल टाईम डेटा याचा समावेश आहे.

या शिवाय सरकारी योजना, बियाण्यांबद्यलची कोणतेही माहिती, फायदे आणि सल्ला शेतकरी ॲपद्वारे शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी हा कार्यक्रम फलोत्पादन विभागासाठी एक साधन म्हणून काम करतो. या डिजिटल सोल्यूशनमुळे एफपीओला सभासद शेतकऱ्यांचे उत्पन्न एकत्रित करून संभाव्य खरेदीदारांना विकण्याचे बळ प्राप्त होते विशिष्ट प्रकारच्या उत्पादनांची मोठ्या प्रमाणात उपलब्धता एफपीओ बाजारातून जास्त किंमतीसाठी वाटाघाटी करू शकते. ज्यामुळे उत्पादकांना जास्तीचा आर्थिक परतावा मिळू शकतो. कंपनीने आत्तापर्यंत ३४३८२ शेतकऱ्यांना सामील कंले आहे, ४६००० एकरहून अधिक जमिनीतून ६० पेक्षा अधिक वस्तूंची विविध पिके घेतलेली जात आहेत.

उत्पादकांशी दुहेरी संवाद

ऑनलाईन, अर्थात आभासी कार्यक्रमात मुख्य कीटक आणि रोगांसह सामान्यत: प्रणालीत (सिस्टीम) आधीच लोड केलेल्या सल्ला व उपाययोजनांचा समावेश आहे जेव्हा ॲप्लिकेशनमधील कीड/ रोग शेतातील जीवंत कीड/ रोगाशी जुळतात, तेव्हा शेतकऱ्यांना त्यांच्या स्थानिक भाषेतील शिफारशींचे सहज आकलन होउन ते तत्काळ कार्यवाही करू शकतात.

जर ते जुळत नसेल तर शेतकरी आपल्या फोनचा वापर करून जिवंत पिकाचे छायाचित्र घेऊ शकतो आणि त्यावर टिप्पण्या जोडून अपलोड

करू शकतो. कृषी विभागातील तज्ञ /शास्त्रज्ञ यांना ही सुचना माहिती तातडीने प्राप्त होते. त्यानंतर, क्षेत्र तज्ञ / शास्त्रज्ञ समस्यांना प्रतिसाद देतात आणि सुयोग्य सल्ला पाठवतात. आपण विनंती केल्यानुसार आपल्या सल्लाचे तारीख आणि उत्पादनासह निराकरण करण्यात आले आहे, असा संदेश संबंधित शेतकऱ्याला प्राप्त होतो. शिफारस केलेल्या कार्यवाहीबाबत तसेच शेतकऱ्याला वेळेवर आणि अचूक माहिती एस.एम.एस. द्वारे दिली जाते.

मोबाईल आधारित तंत्रज्ञान वापरत आहेत शेतकऱ्यांच्या कंपन्या

शेतकरी प्रोफाइल आयोजित करणे त्यांच्या शेतांचे भू-कुंपण करणे, पीक उत्पादन आणि निविष्ठांवरील (इनपुट) नेमक्या वेळांचा डेटा गोळा करणे सहजपणे शक्य झाले. क्लस्टर आधारित हवामान माहिती आणि एसएसएस व्दारे पाठवलेले सल्ले व नियमित सूचनांमुळे ३८४ शेतकरी कंपन्यांना डिजिटल डेटाच्या आधारे धोरणात्मक व्यावसायिक निर्णय घेणे तुलनेने सोपे झाले.

बाजार संपर्क झाला शक्य :

एफपीओ संभाव्य खरेदीदारांसाठी उपलब्ध उत्पादने प्रकाशित करू शकले. ज्यामुळे व्यवहार सोपे आणि ऑनलाईन झाले. केवळ दलालच नाहीसे झाले असे नव्हे, तर शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य भाव मिळू शकला.

शेतकऱ्यांना बाह्य जगाशी जोडणे :

मोबाईल ॲपमधील अगोदरच लोड केलेली भाषा शेतकऱ्यांना पीक, बियाणे, खरेदीदार यांच्याविषयी माहिती मिळवण्यास आणि कमीत कमी वेळेत पीक शास्त्रज्ञांपर्यंत पोहोचण्यास सक्षम करतात. त्यांना पीक विशिष्ठ कीड आणि रोगांबद्दल अगदी वेळेत सल्ला मिळतो. नविन कृषी निविष्ठा (इनपूठ) आणि यंत्रसामुग्रीवरील अद्ययावत माहितीसाठी ते तज्ज्ञांची मदत घेतात. तसेच सरकार किंवा बँकांव्दारे प्रदान केल्या जाणाऱ्या विविध योजना आणि फायद्यांची माहिती देखील मिळते हे सर्व एकाच स्त्रोताखाली सहज उपलब्ध आणि समजण्यास शक्य आहे.

Venkat Maroju
SourceTrace Corporate HQ
125 Cambridgepark Drive
Suite #301, Cambridge,
Massachusetts 02140, USA.
E-mail: vmaroju@sourcetrace.com

मराठी अनुवाद : श्री. अभिजित वाटक

Source : Bringing digital technology to farmers' door steps. Leisa India - June, 2020

प्रिय वाचक

नमस्कार,

आशा आहे आपण व आपले सर्व कुटूंबीय खुशाल आहात !

गेल्या अनेक वर्षापासून लिझा इंडीयाच्या प्रवासाला तुमची साथ व सहकार्य लाभले यासाठी लिजा इंडियाच्या वतीने भी आपले धन्यवाद मानते. आपल्या सर्वांच्या स्वयंस्फूर्त उत्साहामुळे व वाचनामुळे आम्ही आमचा पुढाकार इतके दिवस यशस्वी चालवू शकलो. बरेच सकारात्मक प्रयोग व प्रयत्न लेख रूपात लिजा इंडिया नियतकालीके व्दारे आपल्या पर्यंत पोहोचवू शकलो. बऱ्याच वाचकानी कोविड 19 मध्ये देखिल सहकार्य केले त्या सर्वांचे मी आभार मानते.

शेतकरी व शेती मध्ये रूची असणारे काम करणारे यांच्या पर्यंत वेगवेगळया भाषेत नियतकालीक प्रसारीत करीत आम्ही जास्तीत लोकापर्यंत पोहोचत आहोत. त्यातून शिक्षण व पुढे अर्थपूर्ण बदल शेती व पर्यावरणा मध्ये निर्माण करण्याचा हा अत्यंत प्रामाणिक प्रयत्न आहे. सर्वगोष्टी अवघड परिस्थिती मध्ये थांबू शकतात पण अन्नधान्य उत्पादन थांबवता येणार नाहा, थांबू शकत नाही. तेव्हा, प्रिय वाचकहो ! या वर्षी देखिल आम्हाला सहयोग कराल अशी विनंती वजा अपेक्षा आपण दिलेली कोणतीही रक्कम आम्हाला मान्य आहे व धन्यवादास पात्र आहे. आपण दिलेला प्रत्येक रुपया हा कृषिपर्यावरण व शाश्वत शेतीचा आमचा ध्यास पूर्ण करण्यासाठीच वापरला जाईल.

आपला सहयोग देण्यासाठी सोबत दिलेल्या **CONTRIBUTION FORM** मधील टेबलपैकी कोणताही पर्याय निवडू शकता. आपण दिलेली राशी प्राप्तीकर कायद्याअंतर्गत सेक्शन 80-जी नुसार सूट मिळण्यास पात्र आहे. तशी पोच पावती आपणास मिळेल.

सविनय सादर

T.M.Radha

टी. एम. राधा
कार्यकारी संचालक
ए. एम. ई. फांउडेशन, बेंगलोर
(लिजा इंडिया)